आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१२ जून २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ तारखेपासून, तर महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरु होणार
- आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री म्हणून तेलुगु देसमचे चंद्राबाबू नायडू यांचा, तर ओदिशाचे मुख्यमंत्री म्हणून भाजपाचे मोहन चरण माझी यांचा शपथविधी
- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून इटलीच्या दौऱ्यावर
- महाराष्ट्र विधान परिषदेच्या ४ जागांपैकी ३ जागांवर महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढत
- कुवेतमधे इमारतीला लागलेल्या आगीत किमान चाळीस जणांचा मृत्यू, अनेक जण जखमी /जखमींमधे दहा भारतीयांचा समावेश

**आणि**

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत अमेरिकेविरुद्धच्या सामन्यात नाणेफेक जिंकून, प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा भारताचा निर्णय

**<><><><><>**

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन येत्या २४ तारखेपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनात नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी, लोकसभेच्या सभापतींची निवड, राष्ट्रपतींचं अभिभाषण आणि त्यावर चर्चा होईल. राज्यसभेचं २६४ वं अधिवेशन २७ जूनपासून सुरू होईल आणि संसदेचं हे अधिवेशन ३ जुलै रोजी संपेल.

**<><><><><>**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या २७ जून रोजी  सुरु होणार आहे. या अधिवेशनाची अधिसूचना राज्यपाल रमेश बैस यांनी आज जारी केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या इटलीच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते अपुलिया इथं येत्या शुक्रवारी १४ जूनला होणाऱ्या जी सेव्हन शिखर परिषदेत भाग घेतील. परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे सचिव विनय क्वात्रा यांनी आज नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. प्रधानमंत्री मोदी जी सेव्हन परिषदेत सातव्यांदा सहभागी होत असून गेल्या सलग ४ परिषदांमधे ते उपस्थित होते. जी सात राष्ट्रांच्या नेत्यांशी प्रधानमंत्री द्विपक्षीय चर्चा करतील. इटलीच्या प्रधानमंत्री जॉर्जिया मेलोनी यांचीही ते भेट घेतील.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या ४ जागांपैकी ३ जागांवर महाविकास आघाडी आणि महायुती थेट लढत होणार असून मुंबई शिक्षक मतदारसंघात चौरंगी लढत आहेत. अर्ज मागे घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध उमेदवारांनी अर्ज मागं घेतल्यानं लढती स्पष्ट झाल्या.

कोकण पदवीधर मतदारसंघात महायुतीचे निरंजन डावखरे विरुद्ध महाविकास आघाडीचे रमेश कीर यांच्यात थेट लढत होणार आहे. अखेरच्या दिवशी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे किशोर जैन, राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाचे किशोर सरैय्या आणि शिवसेनेच्या संजय मोरे यांनी माघार घेतली आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात शिवसेनेचे दीपक सावंत यांनी उमेदवारी अर्ज मागं घेतल्यानं भाजपाचे किरण शेलार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांच्यात लढत होईल. मुंबई शिक्षक मतदारसंघात भाजपा समर्थित शिक्षक परिषदेचे शिवनाथ दराडे,  शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे

ज. मो. अभ्यंकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव नलावडे आणि शिक्षक भारतीचे सुभाष मोरे यांच्यात चौरंगी लढत होणार आहे.

नाशिक शिक्षक मतदार मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संदीप गुळवे यांच्याविरोधात शिवसेनेचे किशोर दराडे उभे आहेत. यासह अपक्ष उमेदवार विवेक कोल्हेही रिंगणात आहेत. या मतदार संघात आज अखेरच्या दिवसांपर्यंत एकूण १५ उमेदवारांनी माघार घेतली आहे. त्यात राजेंद्र विखे-पाटील यांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज कृषी मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पुढच्या १०० दिवसांच्या नियोजनावर चर्चा केली. शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाची खतं, बियाणं प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावं, आणि एकूणच कृषि क्षेत्र मजबूत करण्याच्या दृष्टीनं पावलं उचलावी असं चौहान यांनी अधिकाऱ्यांना सांगितलं.

**<><><><><>**

देशात १ जुलैपासून भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम लागू केले जाणार आहेत. या कायद्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पत्र सूचना कार्यालय देशभरात अनेक ठिकाणी परिसंवाद आयोजित करणार आहे, असं माहिती सेवा विभागाचे अधिकारी राजेश सिन्हा यांनी सांगितलं. याच निमित्तानं उद्यापासून रांची इथं आयोजित करण्यात आलेल्या परिसंवादाबाबत ते बातमीदारांशी बोलत होते.

**<><><><><>**

भाजपाचे ज्येष्ठ नेते नितिन गडकरी यांनी आज नवी दिल्लीत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारला. तर, केंद्रीय अर्थ आणि

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रीपदाचा पदभार निर्मला सीतारामन यांनी स्वीकारला. रस्ते वाहतूक आणि महामार्ग राज्यमंत्री अजय टमटा आणि हर्ष मल्होत्रा यांनीही आज मंत्रालयाची सूत्रं हाती घेतली.

ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज ईशान्य क्षेत्र विकास मंत्रालयाचा पदभार स्वीकारला.

**<><><><><>**

कुवेतमधल्या मंगाफ शहरातल्या एका सहा मजली इमारतीला लागलेल्या आगीत आज चाळीसहून अधिक जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी  दहा लोक भारतीय आहेत. जखमी भारतीयांची कुवेतमधल्या भारतीय दूतावासातल्या अधिकाऱ्यांनी रुग्णालयात भेट घेतली. दुर्घटनेत सापडलेल्या भारतीयांनी मदतीसाठी ९६५-६५ ५० ५२ ४६ या क्रमांकावर संपर्क करण्याचं आवाहन भारतीय दूतावासानं केलं आहे. या क्रमांकावर फोन, व्हॉट्सअप किंवा मेसेज करता येईल, असंही त्यांनी सांगितलं आहे.

या दुर्घटनेबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केलं आहे. कुवेतमधला भारतीय दूतावास या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि पीडितांना मदत करण्यासाठी स्थानिक यंत्रणांसोबत काम करत आहे, असं आश्वासन प्रधानमंत्र्यांनी दिलं आहे. दरम्यान, परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री कीर्तीवर्धन सिंह या दुर्घटनेतल्या जखमींना दिल्या जाणाऱ्या मदतीवर देखरेख करण्यासाठी कुवेतला जात आहेत.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अमेरिकेसोबत न्युयॉर्कमधे नासॉ कौंटी आंतरराष्ट्रीय क्रिकेट मैदानावर सुरु आहे. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

पहिल्याच चेंडूवर अर्शदीप सिंगनं जहांगिरचा बळी घेतला. तर पहिलं षटक संपताना अमेरिकेचा दुसरा गडी एंड्रियस गोस बाद झाला.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा अमेरिकेच्या एका षटकात २ बाद ३ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात यंदा पहिल्यांदाच मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईमध्ये चित्रपट प्रदर्शित केले जाणार आहेत. शनिवारपासून सुरू होणारा हा महोत्सव २१ जूनपर्यंत सुरू राहणार आहे. मुंबईत फिल्म डिविजनच्या प्रांगणात आणि पुण्यात राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयात याअंतर्गत चित्रपट दाखवले जातील. ऑनलाइन नोंदणीशिवाय थेट येणाऱ्यांनाही चित्रपट प्रदर्शनाच्या ठिकाणी नोंदणी करता येईल.

यंदाचा महोत्सव दिव्यांगस्नेही होण्यासाठी स्वयम या स्वयंसेवी संस्थेसोबत NFDC ने भागीदारी केली आहे. या महोत्सवातले चित्रपट कर्णबाधित व्यक्तींसाठी सब टायटल्स आणि हातवाऱ्यांच्या भाषेसह प्रसारित केले जातील. दृष्टीबाधित व्यक्तींना या चित्रपटांची माहिती स्वतंत्रपणे ऐकता येईल, असं महोत्सवाचे संचालक प्रिथुल कुमार म्हणाले. दिव्यांगजन फिल्म याअंतर्गत ४ विशेष चित्रपट १९ जून रोजी महोत्सवात दाखवले जातील.

**<><><><><>**

कर्करोगाच्या रुग्णांना दिल्या जाणाऱ्या किरणोपचार पद्धतीचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी तयार केलेली ॲक्टोसाइट ही गोळी आज अणुऊर्जा विभागात आयोजित कार्यक्रमाद्वारे बाजारपेठेत उपलब्ध करण्यात आली.

भाभा अणुसंशोधन केंद्र, कर्करोग संशोधन आणि शिक्षण केंद्र, टाटा मेमोरियल रुग्णालय आणि एका खासगी प्रयोगशाळेच्या शास्त्रज्ञांनी तयार केलेली या गोळीचा

चांगला परिणाम विशेषतः शरीराच्या खालच्या भागातल्या अवयवांचे कर्करोग झालेल्या रुग्णांमध्ये दिसून आल्याचं भाभा अणुसंशोधन केंद्राच्या किरणोपचार जैवशास्त्र आणि आरोग्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्राध्यापक संतोष संडूर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

दहशतवाद्यांविरुद्ध जम्मू काश्मीर मधल्या कथुवा जिल्ह्यातल्या सैदा सोहल गावात काल संध्याकाळपासून सुरु झालेल्या सुरक्षा दलांच्या कारवाईत आज आणखी एक दहशतवादी ठार झाला. त्यामुळं या कारवाईत ठार झालेल्या दहशतवाद्यांची संख्या आता ३ वर पोचली आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राचा जर्मनीतल्या बाडेन-वुटेनबर्ग या राज्याशी उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याकरता झालेला करार हा मानव संसाधन विकास क्षेत्रातला मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला आहे. या कराराच्या अनुषंगानं सुकाणू समितीची बैठक जर्मनीत स्टुटगार्ड इथं झाली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभाग नोंदवला. त्यावेळी ते बोलत होते. या करारामुळे दोन्ही राज्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल, तसंच भविष्यात विविध क्षेत्रांमधला सहकार्याचा मार्ग मोकळा होईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

हरियाणा राज्य दिल्लीकरता पुरेसा पाणी पुरवठा करत असून हा पुरवठा दिल्लीला देय असलेल्या वाट्यापेक्षा अधिक असल्याचं हरियाणाचे जलसिंचन आणि जल संसाधन राज्यमंत्री डॉ. अभय सिंह यादव यांनी म्हटलं आहे. पाणीपुरवठ्याबाबत गोंधळ माजू नये म्हणून हरियाणा सरकार सर्वतोपरी काळजी

घेत असून भविष्यातही याबाबत प्रमाद घडणार नाही अशी ग्वाही यादव यांनी दिली आहे.

**<><><><><>**

नैऋत्य मान्सून आज महाराष्ट्राच्या आणखी काही भागात, संपूर्ण तेलंगणा आणि छत्तीसगडच्या आणखी काही भागात पुढे सरकला आहे. ओडिशाच्या आणखी काही भागात नैऋत्य मान्सून पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

येत्या ४-५ दिवसांत उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, आणि झारखंडच्या काही भागांत उष्णतेची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, चंदिगढ, दिल्ली, मध्य प्रदेश, राजस्थान, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि ओडिशा या राज्यांच्या काही भागात उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**